# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 01/08/2020 (शनिवार)

(दुपार)

---

### अवैद्य सुगंधीत तंबाखु व पानमसाला वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पोलिस स्टेशन केळवदची कारवाई

पो.स्टे. केळवद :– दि. 31/07/2020 रोजी मुखबीर च्दारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे ने एक एमएच– 31/बीसी– 8812 क्रमांकाची आयसर ट्रक मध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेली सुगंधीत तंबाखु व पानमसालाची वाहतुक होत आहे. अशी माहिती मिळाल्यावर पो.स्टे केळवद पोलिस स्टाफ यांच्या मदतीने सावळी फाटा येथे नाकाबंदी केली. दि. 31/07/2020 चे 04.00 वा. सुमारास पो.स्टे. केळवद पथकाने रस्त्याने येत असलेल्या एमएच– 31/बीसी– 8812 क्रमांकाची आयसर ट्रकला थांबवून चेक केले असता त्यामध्ये मिळालेल्या माहिती प्रमाणे सुगंधीत तंबाखु व पानमसाला असल्याचे आढळून आले. त्यासोबत असणारा आयसर ट्रकचा चालक आरोपी नामे– 1) प्रविण शिवाजी जौंजाळ वय 30 वर्षे रा. वानाडोंगरी 2) देवेंद्र अटलदास चौबे वय 28 वर्षे रा. छिंदवाडा 3) राजेश श्रीराम तुरकर वय वर्षे 40 रा. दिघोरी नरसाळा नागपूर यांना अटक करण्यात आले. आरोपीतांच्या ताब्यातून सुगंधीत तंबाखु व पानमसाला कि. 3,19,984/–रू. एमएच– 31/बीसी– 8812 क्रमांकाची आयसर ट्रक कि. 4,50,000/–रू. चा असा एकुण कि. 7,69,984/–रू. चा मुद्देमाल मिळुन आले.

पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 328,272,273,188,34 भादवी, सहकलम अन्न सुरक्षा च मानदे कायदा 2006 कलम 59 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्रीमती मोनिका राउत, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, पोहवा सुभाष राठोड, सफौ अमरदिप कामठे, नापोशी राजेन्द्र रेवतकर, पोशी सचिन येळकर, चालक गुणेश्वर डाखोळे व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.



# अवैध देशी दारू अड्ड्यात धाड

## पो.स्टे अरोलीची कार्यवाही

पो.स्टे. अरोली :– आज दिनांक 01/08/2020 ला बकरी ईद बंदोबस्त दरम्यान पो. स्टे. अरोली स्टाफ यांना मिळालेल्या खबरेवरून सपोनि श्री. विवेक सोनवणे यांचे मार्गदर्शनात पो. स्टे. अरोलीचा स्टाफने सापळा रचुन आरोपी नामे– रंजीत झींगरजी मेश्राम, वय 40 वर्ष, रा. खात ता. मौदा जि. नागपुर याचेवर प्रोव्हीशन बाबत रेड केली असता त्याच्या ताब्यातुन एका कापडी पिश्वीत प्रत्येकी 180 एमएल देशी दारूने भरलेल्या देशी दारू प्रिमीअम नं. 1 लेबलच्या 14 देशी दारूचया सिलबंद निपा असा एकुण कि. 728/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

तसेच आरोपी नामे– रामप्रसाद गंगाराम मांढरे, वय 38 वर्ष, रा. खात ता. मौदा जि. नागपुर याच्या घरी धाड घातली. दरम्यान आरोपीच्या घरामध्ये अवैधरीत्या 180 मिली 192 सिलबंद देशी दारूने भरलेल्या निपा असा एकुण कि. 9,984/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला. तसेच दुसऱ्या प्लॉस्टीक चुंगळीत प्रत्येकी 90 मिली देशी दारूच्या कोकण देशी दारू संत्रा 999 अशा लेबलच्या एकुण 144 देशी दारूच्या सिलबंद निपा कि. 3,744/–रू. असा एकुण संपुर्ण 13,728/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो. स्टे अरोली येथे गुन्हा दाखल आहे. असा एकुण दोन्ही गुन्हयातील एकुण 14,456/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.यातील दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. विवेक सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक श्री. ऋषीकेश चाबुकस्वार, पोनाईक राजेंद्र पुडके, विशाल महालकर, सतिश मोटघरे, पोशि प्रविण मरसकोल्हे, ओमप्रकाश सहारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



## अपघातात मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील घुबडमेट शिवार काटोल येथे आरोपी नामे– राहुल रामभाऊ खडसे, वय 35 वर्ष, रा. गोंडी मोहगाव हा दि. 16/07/2020 चे 11:00 वा. दरम्यान त्याची एम.एच–40/बि.पी–0117 क्रमांकाच्या मोटरसायकलवर त्याची आई नामे– कुसूम रामथाऊ खडसे, वय 60 वर्ष, गोंडी मोहगाव यांना डबल सिट बसवुन गोंडी मोहगाव वरून काटोल ला जात होता. आरोपीने त्याचे ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन घुबडमेट शिवारात रोडवरील पुलाजवळ अचानक त्याच्या मोटरसायकल समोर कुत्रे आडवे आल्याने त्याचा मोटरसायकल वरील नियंत्रण गेल्याने मोटरसायकल स्लिप झाली. त्यामुळे मोटरसायकल सह आरोपी रोडवर पडुन घासत जावुन जखमी झाला. आरोपीच्या मागे बसुन असलेली त्याची आई यांना डोक्याला मार लागल्याने त्यांना ग्रामीण रूग्णालय काटोल व नंतर नागपुर येथे नेले असता उपचारा दरम्यान कुसूम खडसे यांचा दि. 17/07/2020 रोजी मृत्यू झाला. सदर मर्ग चे चौकशी वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ जवाहर चव्हाण पो. स्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर आययुडीपी काटोल येथे दिनांक 14/05/2020 चे 10.00 वा. ते दिनांक 31/07/2020 10.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– अक्षय अनिल नेवासकर, वय 26 वर्ष, रा. आययुडीपी काटोल हा नौकरीच्या शोधात ओएलएक्स डॉट कॉम येथे रिलायन्स जिओ टॉवर वरती जॉबकरीता माहीती घेत असता टॉवर सुपरवायझर या पदावरती नागपुर विभागात नौकरी उपलब्ध असल्याचे सांगीतले फिर्यादीने त्यांना कागदपत्रे दिले असता फिर्यादीला खोटे नियुक्ती पत्रे देण्यात आले. फिर्यादीला ट्रेनिंग करीता जाणे असल्याने त्याला पैसे भरण्याकरीता सांगितले फिर्यादीने आरोपी नामे– 1) निधी वर्मा, 2) संजय कुमार व 3) सुरज सिंह तिन्ही रा. नवी दिल्ली यांच्या सांगण्याप्रमाणे आतापर्यंत 2,70,400/–रू. एवढी रक्कम त्यांचा वेगवेगळया खात्यात ट्रान्सफर केले. तरीही फिर्यादीला जॉब लावुन दिले नाही. फिर्यादीला नौकरीचे आमीष दाखवुन त्याची आर्थीक हानी करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 420, 468, 471, 34 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पिवाल 8806117774 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर